RNI. No. MAH/MAR/2007/20440

मराठी साप्ताहिक भ्रष्टाचार, अन्याय, अत्याचार यांचा सामना

# सत्य कामना

सत्यमेव जयते



संपादक : तुकाराम (महाराज) पाटील
मोबा. ९३७०१९०६९२

Email : satyakamana20440@gmail.com

कार्यकारी संपादक : श्रीकांत दत्ताराम म्हात्रे
मोबा. ९८२२०५०९५०

| वर्ष १४ | अंक ३८ वा | मुंबई, ठाणे, रायगड | सोम. १८ ते २४ जानेवारी २०२१ | किं.१ रु. | पृष्ठ ४ |
|---|---|---|---|---|---|

# पनवेल-कर्जत थेट लोकल चार वर्षांनंतरच

**एमयूटीपी-३ अंतर्गत असलेल्या पनवेल ते कर्जत नवीन दुहेरी मार्गाचे प्रत्यक्षात काम एका महिन्यानंतर सुरू होणार आहे.**

**मुंबई :** हार्बर आणि मध्य रेल्वे मार्गावरील प्रवाशांसाठी आणखी एक पर्याय ठरू शकणारी पनवेल ते कर्जत लोकलसेवा सुरू होण्यासाठी आणखी चार वर्षे प्रतीक्षा करावी लागणार आहे. एमयूटीपी-३ अंतर्गत असलेल्या पनवेल ते कर्जत नवीन दुहेरी मार्गाचे प्रत्यक्षात काम एका महिन्यानंतर सुरू होणार आहे. मात्र, या मार्गावरील कामे पूर्ण करेपर्यंत २०२४ साल उजाडण्याची शक्यता अधिकाऱ्यांनी व्यक्त केली आहे.पनवेल ते कर्जत सध्या एकच मार्गिका असून लांब पल्ल्याच्या गाड्या किंवा मालवाहतुकीसाठी त्याचा वापर होत असतो. कर्जत आणि पनवेलमधील प्रवासासाठी व्हाया ठाणे किंवा कुर्ला मार्गे लोकलने जावे लागते. अन्यथा रस्ते वाहतुकीचा पर्याय निवडावा लागतो. मात्र त्यात बराच वेळ जातो. जर पनवेल ते कर्जत अशी थेट लोकल सुरू झाल्यास त्याचा फायदा अनेक प्रवाशांना मिळू शकतो. त्यासाठी येथे नवीन



उपनगरीय मार्गिका बनवण्याचा निर्णय घेण्यात आला होता.मुंबई रेल्वे विकास महामंडळाच्या (एमआरव्हीसी) एमयूटीपी-३ मधील प्रकल्पांचा खर्च १० हजार ९४७ कोटी रुपये असून यातील २ हजार ७८३ कोटी रुपये पनवेल ते कर्जत दुहेरी मार्गासाठी खर्च होणार आहे. एमयूटीपी-३ ला डिसेंबर २०१६ ला मंजुरी मिळाली, परंतु यातील कळवा ते ऐरोली उन्नत मार्ग, विरार ते डहाणू चौपदरीकरणासह पनवेल ते कर्जत दुहेरी मार्ग इत्यादी प्रकल्प निधी, निविदा व भूसंपादनातील अडचणींमुळे पुढेच सरकू शकलेच नाहीत.पनवेल ते कर्जत उपनगरीय दुहेरी मार्ग प्रकल्प राबवण्यासाठी सल्लागार नियुक्त करण्याचा निर्णय घेतला होता. त्यासाठी काढलेल्या निविदांना मे २०१९ मध्ये मंजुरी मिळाली.

आता त्याचा सविस्तर प्रकल्प अहवाल सादर झाल्यानंतर काही सर्वेक्षण व अन्य कामे बाकी आहेत. एका महिन्यात ती पूर्ण करून त्यानंतर प्रत्यक्षात या मार्गिकेचे काम सुरू होणार असल्याचे सांगण्यात आले. करोनामुळेही मध्यंतरी प्रकल्पाचे काम थांबले होते, परंतु आता ते सुरू करण्यात आले. दुहेरी उपनगरी मार्ग तयार करण्यासाठी चार वर्षे लागणार आहेत. यात सध्याच्या पनवेल येथील मार्गिकेवरूनच उन्नत मार्गिका उभारण्यात येईल व काही अंतर संपताच ही नवी मार्गिका उतरेल. त्यासाठी छोटा उन्नत पूलही उभारला जाईल. अशाच प्रकारचे काम कर्जत स्थानकातही केले जाणार आहे.प्रस्तावित स्थानकेया दुहेरी मार्गिकेमुळे पनवेल ते कर्जतदरम्यान राहणाऱ्या नागरिकांना मोठा फायदा मिळणार आहे. प्रकल्पात पनवेल, चौक, मोहापे, चिखले, कर्जत अशी पाच स्थानके असतील. याशिवाय फलाट, पादचारी पूल, भुयारी मार्ग इत्यादी कामे मोठ्या प्रमाणात होणार आहेत. दुहेरी मार्ग साधारण २०२२ मध्ये होणे अपेक्षित होते, मात्र आता त्याला आणखी विलंब होणार आहे.

# अर्थसंकल्प १ फेब्रुवारीला

संसदेचे अर्थसंकल्पीय अधिवेशन २९ जानेवारीपासून होणार असून वित्त वर्ष २०२१-२२चा केंद्रीय अर्थसंकल्प सोमवार, १ फेब्रुवारी २०२१ला सादर केला जाणार आहे. करोना प्रतिबंधित उपाययोजनांचा भाग म्हणून यंदा अर्थसंकल्पाच्या छापील प्रती संसद सदस्यांना वितरित करण्यात येणार नसल्याचे यापूर्वीच जाहीर करण्यात आले आहे.राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या अभिभाषणाने अर्थसंकल्पीय अधिवेशनास प्रारंभ होणार असून पहिल्या टप्प्यात सत्र १५ फेब्रुवारीपर्यंत चालेल. तर पुन्हा ८ मार्चपासून संसदेचे सत्र सुरू होईल. ८ एप्रिलला अधिवेशन संस्थगित होईल, अशी माहिती लोकसभेच्या सचिवांनी गुरुवारी दिली.अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी २०२०-२१चे आर्थिक सर्वेक्षण संसदेत मांडले जाईल. त्यानंतर दुसऱ्या दिवशी केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सितारामन पुढील आर्थिक वर्षांचा अर्थसंकल्प सादर करतील.चालू आर्थिक वर्षांच्या सलग दोन तिमाहीतील



शून्याखाली आक्रसणारा विकास दर, रोडावणारा महसूल व विस्तारणारी वित्तीय तूट आदींच्या आव्हानांचे प्रतिबिंब यंदाच्या अर्थसंकल्पात उमटण्याची शक्यता आहे.वित्त वर्षांच्या प्रारंभालाच करोना-टाळेबंदीच्या संकटा दरम्यान आर्थिक साहाय्याच्या क्रमवार व क्षेत्रनिहाय उपाययोजना राबविल्यानंतर नव्या अर्थसंकल्पात पुन्हा अर्थव्यवस्थेला थेट हातभार लागेल अशा निर्णयांची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# सायबर हल्लेखोरापासून सतर्कता बाळगा;गृहमंत्री अनिल देशमुख यांचे आवाहन

राज्यात प्रत्येक जिल्ह्यात करोना लसीकरण केंद्र सुरू करण्यात आले असून याचा फायदा सायबर हल्लेखोरांकडून घेतला जात आहे. त्यामुळे नागरिकांनी सतर्क राहावे, असे आवाहन गृहमंत्री अनिल देशमुख यांनी शनिवारी केले.

राज्यात प्रत्येक जिल्ह्यात करोना लसीकरण केंद्र सुरू करण्यात आले असून याचा फायदा सायबर हल्लेखोरांकडून घेतला जात आहे. त्यामुळे नागरिकांनी सतर्क राहावे, असे आवाहन गृहमंत्री अनिल देशमुख यांनी शनिवारी केले.करोनावर मात करण्यासाठी भारतीय बनावटीच्या दोन लशी देण्याच्या मोहिमेला सुरुवात झाली असून, ही मोहीम केंद्रीय यंत्रणेच्या नियंत्रणाखाली



प्रत्येक जिल्ह्यात राज्य सरकारी यंत्रणेमार्फत राबविली जात आहे.

मात्र सायबर हल्लेखोर या कार्यक्रमाचा दुरुपयोग करण्याची शक्यता असल्याचे गृहमंत्री देशमुख यांनी ट्वीटरवर माहिती देताना म्हटले आहे.काही सायबर हल्लेखोर नागरिकांना फोन करून या लशीची नोंदणी करण्यासाठी मोबाइलवर आलेला ओटीपी, आधार क्रमांक, पिनकोड व इतर वैयक्तिक माहिती घेऊन आर्थिक लूट करत असल्याचे निदर्शनास आले आहे. अशा भूलथापांना नागरिकांनी बळी पडू नये, आपली कोणतीही माहिती उघड करू नये, असे गृहमंत्री देशमुख यांनी जनतेला उद्देशून आवाहन केले आहे. जर एखाद्या व्यक्तीला करोना लसीकरणाच्या बाबतीत अशा प्रकारचे फोन आले असतील, तर त्यांनी याची माहिती पोलिसांना द्यावी किंवा महाराष्ट्र सायबर विभागात तक्रार करावी, असे गृहमंत्र्यांनी स्पष्ट केले.

# वालधुनी नदी प्रदूषण प्रकरणी ५८ कंपन्यांना नोटीस

वालधुनी नदीत सातत्याने रासायनिक कंपन्यांकडून रसायने सोडण्याच्या वाढत्या प्रकारांमुळे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने गेल्या महिनाभरात आणि रविवारच्या घटनेनंतर अंबरनाथ एमआयडीसीतील एकूण ५८ कंपन्यांना नोटिसा बजावल्याची माहिती समोर आली आहे.

वालधुनी नदीत सातत्याने रासायनिक कंपन्यांकडून रसायने सोडण्याच्या वाढत्या प्रकारांमुळे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने गेल्या महिनाभरात आणि रविवारच्या घटनेनंतर अंबरनाथ एमआयडीसीतील एकूण ५८ कंपन्यांना नोटिसा बजावल्याची माहिती समोर आली आहे. मात्र, कंपन्यांना नोटिसा बजावण्याची संख्या वाढत असली तरी प्रत्यक्षात वालधुनीत रसायने सोडण्याचे प्रमाण कमी होताना दिसत नाही. त्यामुळे एमपीसीबीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या पाहणी दौऱ्यानंतर एमआयडीसी ते अंबरनाथ तसेच उल्हासनगर भागातून वाहणाऱ्या वालधुनीच्या किनाऱ्यावरील ११ ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात येणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.अंबरनाथच्या आनंदनगर एमआयडीसीला लागून वालधुनी नदीचा प्रवाह आहे. गेल्या काही वर्षांत वालधुनीवर अतिक्रमण करणे, रसायनांवर प्रक्रिया न केलेले पाणी वालधुनीच्या प्रवाहात सोडण्याचा प्रकार वाढला आहे. शनिवारी रात्री आणि रविवारी पहाटेच्या सुमारास आनंद नगर एमआयडीसीतून जाणाऱ्या काटई कर्जत महामार्गाखालून वाहणाऱ्या वालधुनी नदीच्या काठावरील अंबरनाथ, उल्हासनगरमधील रहिवासी भागांमध्ये उग्र दर्प सुटल्याने खळबळ उडाली होती.या घटनेचा तपास एमपीसीबी आणि पोलिस करत असून सोमवारी पर्यावरण वैज्ञानिक विभागाचे प्रधान सचिव डॉ. अमर सुपाते यांनीही एमपीसीबीच्या अधिकाऱ्यांसह रसायने सोडलेल्या वालधुनी नदीची पाहणी केली. या रसायनांचे नमुने घेत, संबंधित कंपन्यांचा शोध घेऊन त्यांच्यावर कठोर कारवाई करण्याचे आदेश यावेळी सुपाते यांनी दिले आहेत. तसेच आनंदनगर एमआयडीसी ते अंबरनाथ, उल्हासनगर या शहरातून वाहणाऱ्या आणि वालधुनीपर्यंत मार्ग असणाऱ्या महत्त्वाच्या ११ ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात येणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली.रविवारी घडलेल्या घटनेनंतर एमपीसीबीच्या अधिकाऱ्यांनी आनंद नगर एमआयडीसीतील अनेक कंपन्यांची तपासणी केली. मात्र ज्या प्रकारचा दर्प वालधुनीतून येत होता, त्या दर्पाचे रसायन आनंद नगर एमआयडीसीत



असण्याची शक्यता कमी असल्याचेही सूत्रांनी सांगितले आहे. अशा प्रकारचा केमिकलचा वापर हा गुजरात आणि तळोजा एमआयडीसीतील अनेक कंपन्या करतात. त्यामुळे गुजराथ अथवा तळोजा एमआयडीसीतील कंपन्यांतून टँकरद्वारे केमिकल आणून येथे सोडण्याची अधिक शक्यता असल्याचीही माहिती एमपीसीबीच्या एका अधिकाऱ्याने दिली आहे. वालधुनीच्या काठावर विविध ठिकाणी कॅमेरे लावल्यानंतर तरी रात्री अंधारात अशा प्रकारांवर वचक बसण्याची शक्यता आहे.स्थानिकांचा सहभाग?टँकरमध्ये असलेल्या काहीशे लिटर रसायनांवर नियमानुसार प्रक्रिया करण्यासाठी अंदाजे १० लाखांहून अधिक खर्च येत असतो. मात्र, कुठलीही प्रक्रिया न करता, थेट टँकरमध्ये रसायन भरून ती राज्यात कुठल्याही ठिकाणी सोडण्यासाठी केवळ तीन लाखांपर्यंत खर्च होत असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. त्यामुळे कंपन्या हा स्वस्तातला पर्याय अवलंबत असतात. मात्र, अशा घटनांमध्ये रसायने सोडतांना एखादा स्थानिक पुढारी, पोलिस, एमपीसीबी, एमआयडीसी सारख्या विभागांचा सहभाग असण्याची शक्यता नाकारता येत नाही.

## जाहिर आवाहन

"सत्य कामना" सदर साप्ताहिक हे सध्या कार्यकारी संपादक श्रीकांत म्हात्रे चालवित आहेत. तरी यापूर्वी असलेले सदर साप्ताहिकाचे पत्रकार, कर्मचारी यांनी संबंधीत साप्ताहिकाच्या बातमीसाठी कार्यकारी संपादक श्रीकांत म्हात्रे यांच्याशी संपर्क साधून पुढील कामकाज सुरु ठेवावे ही विनंती.

संपादक - तुकाराम पाटील

सत्य कामना सोम. १८ ते २४ जानेवारी २०२१

# नेताजी सुभाषचंद्र बोस जयंती

आपला भारत देश १५ ऑगष्ट १९४७ रोजी स्वतंत्र झाला. त्यात अनेक क्रांतीकारक देश भक्तांचा फार मोठा वाटा आहे. नेताजी सुभाष चंद्र बोस हे त्यातलेच एक मोठे नाव देशावर प्रेम म्हणजे कोणत्या प्रकारचे आणि किती.? मना पासून देशावर प्रेम करणे, देश आपलाच मानणे, देशाचा मान तोच माझा मान, देशाचा अपमान तोच माझा अपमान. नेताजी कॉलेज मध्ये शिकत असताना एका इंग्रजी प्राध्यापकाने शिकवताना भारताची टवाळी केली. नेताजींना ते सहन झाले नाही. ते आपल्या जागेवरून उठले आणि त्यांनी त्या प्राध्यापकाच्या थोबाडीत मारली. परिणाम म्हणून सुभाष बाबूंना कॉलेज मधून काढून टाकले. मग आशुतोष मुखर्जींनी मध्यस्थी केली. आणि परत कॉलेज मध्ये घेतले. असे नेताजींचे देशावर अतिशय मनापासून प्रेम होते. कटक येथील नामवंत वकील बोस व प्रभावतीदेवी या सुशिक्षित व सुसंस्कृत दाम्पत्याच्या पोटी २३ जानेवारी १८९७ रोजी कटक येथे सुभाषचंद्र यांचा जन्म झाला. वयाच्या पंधराव्या वर्षी रामकृष्ण परमहंस व विवेकानंद त्यांच्या जीवनात आले.व ते सतराव्या वर्षी सदगुरुं च्या शोधासाठी गिरीकंदरांत –हिमालयात वणवण भटकत राहिले. त्यांचे वडील प्रज्ञावान व स्वतंत्र्य विचारांचे व परखड वृत्तीचे होते. तर आई अगदी "श्यामची आई" होती. वडील रायबहादूर होते. पण इंग्रजांचे उर्मट वर्तन पाहून त्यांनी नोकरी व पदवी दोन्ही सोडून दिल्या सुभाषचंद्र वडिलांच्या सामाधानासाठी आय. सी.एस. होण्यासाठी इंग्लंडला गेले व केंब्रीज विद्यापिठाचे पदवीधर होवून परत आले.१९२१ सालच्या



जालियन हत्याकान्डाने संतप्त होवून त्यांनी आय. सी. एस. होवूनही त्यांनी इंग्रजांची नोकरी स्वीकारली नाही. मातृभूमी स्वतंत्र करण्याचा विडा उचलला. गांधीजींना भेटले तेव्हा गांधीजींनी असहकाराचे आंदोलन सुरु केले होते. त्यांनी सुभाषचंद्र बोस यांना डॉ. चित्तरंजनदास यांच्या कडे पाठविले. बंगाली युवकांचा कंठमणी , बॅरिस्टर, फर्डा वक्ता, देशभक्त, विद्वान गुरु, हिमालयात मिळाला नव्हता.तो गांधीजींनी दिला. दोघांची हि कारागृहातच मैत्री जमली. गुरु-शिष्याचे नाते तयार झाले. बंगाली क्रांतीकार्कीणा व युवकांना दोघांचे जबरजस्त आकर्षण. सुभाषचंद्र बोस बंगाल प्रांतिक परिषदेचे अध्यक्ष झाले. एका दहशतवाद्याचा सत्कार केल्याच्या आरोपांवरून इंग्रजांनी सुभाषचंद्र यांना मंडालेच्या तुरुंगात पाठविले. त्यांची प्रकृती बिघडल्या वरून १९२७ साली त्यांना मुक्त केले. १९३३ ते १९३६ या काळात ते युरोप मध्ये होते. ऑस्ट्रीयात व्हिएन्नाला राहिले. हिटलर, मुसोलिनी, इमोन डी, व्हालेरांना भेटले. युरोपच्या राजकारणाचा अभ्यास केला १९३८ च्या हरिपुरा कॉंग्रेसं चे अध्यक्ष निवडले गेले. १९३९ साली हि त्यांनाच अध्यक्ष म्हणून निवडण्यात आले. गांधीजींना ते मान्य नव्हते. म्हणून त्यांनी राजीनामा दिला. फ़ौरवर्डब्लाकची लढाऊ आघाडी उघडली. सुभाषचंद्र यांचे व्यक्तिमत्व लढाऊ व वादळी होते. त्यांमुळे ब्रिटीश सरकारने त्यांची धास्तीच घेतलेली होती. त्यासाठी त्यांना ते नेहमीच तुरुंगात पाठवीत. १९४१ साली सुभाषचंद्र यांना वेषांतर केले. आणि "झियाउद्दीन" असे नाव धारण करून ते ब्रिटीश्यांच्या नजर कैदेतून सुटले. त्यांच्या भव्य व बलदंड शरीरावरून ते पठाण वाटत. ते भारत सोडून गेले.ब्रीटीश्यांचे जे जे शत्रू हते त्यांना त्यांना ते भेटले. जर्मनीत हिटलरला, जपान मध्ये टोजोला. त्यांनी भारतातले नौजवान एकत्रित केले. आणि ' आझाद हिंद सेना' स्थापन केली. ब्रिटीश्याबरोबर युद्ध करून भारत स्वाभिमानाने स्वतंत्र करायचा असा सुभाष बाबुच्या निश्चय होता. ते तरुणांना म्हणत "तुम मुझे खून दो मै तुम्हे आझादी दुंगा" तुम्ही मला रक्त द्या मी तुम्हाला स्वातंत्र देईन 'मजल-दर मजल, करीत आझाद हिंद सेना भारताच्या रोखाने येत होती. तिने रंगून पर्यंत धडक मारली. पण इंग्रजांच्या शक्ती पुढे तिचे चालले नाही. मग सुभाषबाबूंनी सेनेच्या सैनिकांना "इंग्रजांच्या हाती सापडू नका आज जरी आपल्याला शस्त्र ठेवावे लागत असले तरी पुन्हा तयारी करून पुन्हा सामर्थ्याने ते आपल्याला उचलायचे आहे". असे सांगितले. १८ ऑगष्ट १९४५ साली तैवान विमानतळा वरून प्रयाण करीत असताना भडकत्या ज्वालांच्या प्रकाश्यात त्यांची प्राणज्योत विलीन झाली.

"जय हिंद जय भारत".

# पत्रकार सुरक्षा समितीची नियुक्ती,ओळख पत्र व निवड जाहीर

**सोलापूर :** पत्रकार सुरक्षा समितीची सोलापूर येथे बैठक घेण्यात आली या बैठकीच्या अध्यक्षस्थानी राज्य उपाध्यक्ष मल्लिनाथ जळकोट होते या बैठकीत पत्रकारांच्या विविध विषयावर चर्चा करण्यात आलीनूतन जिल्हा अध्यक्ष यांचा सत्कारपत्रकार सुरक्षा समितीचे नूतन जिल्हा अध्यक्ष रामचंद्र सरवदे यांचा पुष्पगुछ देऊन राज्य उपाध्यक्ष मल्लिनाथ जळकोट यांनी सत्कार केलाजिल्हा कार्याध्यक्ष पदी शब्बीर मणियार यांची निवडपत्रकार सुरक्षा समितीच्या सोलापूर जिल्हा कार्याध्यक्ष पदी शब्बीर मणियार यांची निवड करण्यात आली असून त्यांना नियुक्ती पत्र ओळख पत्र व पुष्पगुछ देऊन जिल्हा अध्यक्ष रामचंद्र सरवदे यांनी शुभेच्छा दिल्यानियुक्ती पत्र व ओळख पत्र प्रदानपत्रकार सुरक्षा समिती सोलापूर शहर अध्यक्ष डॉ रवींद्र सोरटे, संघटक धर्मण्णा गोरे, कार्याध्यक्ष आन्सर तांबोळी, उपाध्यक्ष बिपीन दीड्डी सचिव अभिषेक चिलका, मल्लिकार्जुन गणपा, नागनाथ गणपा गिरीश गोसकी यांना जिल्हा अध्यक्ष रामचंद्र सरवदे



यांनी नियुक्ती पत्र व ओळख पत्र देऊन शुभेच्छा दिल्यानिवडपत्रकार सुरक्षा समिती नूतन संपर्क प्रमुख लक्ष्मण गणपा व शहर प्रसिद्धी प्रमुख म्हूणन भास्कर बोधूल यांची निवड करण्यात आलीयावेळी प्रदेश अध्यक्ष यशवंत पवार अक्षय बबलाद, प्रसाद ठक्का, वैजिनाथ बिराजदार, प्रदीप पेदापल्लीवार, विवेकानंद खेत्री, प्रसाद जगताप, अशोक ढोणे, मिलिंद मुळे, डी डी पांढरे, इम्तियाज अक्कलकोटकर, तात्या कदम, राजाभाऊ पवार, अशोक माचन, संतोष खलाटे महमद शेख, यशवंत शेंद्रे सह पत्रकार मोठया संख्येने उपस्थित होते.

बातमीदार : काळूराम भोईर

# कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेतील प्रभाग क्षेत्र अधिकारी कोणाच्या तरी दबावाखाली काम करताना दिसत आहेत

**डोंबिवली :** कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेतील बऱ्याच वॉर्डला पत्रकारांनी भेटी देऊन अनधिकृत कमांबाबत विचारणा केली असता प्रत्येक वॉर्ड अधिकारी ह्या विषयावर उत्तर देण्यास टाळाटाळ करत असतात व अनधिकृत कामे तर जोरात सुरू आहेत ही बाब फार गंभीर असून मा. आयुक्त साहेबांनी वेळेत लक्ष घालून अधिकाऱ्यांसकट सर्वांवर लवकरात लवकर कारवाई करावी. नाही तर ह्या पुढे विचित्र परिस्थिती निर्माण होईल. त्यास जबाबदार कोण ?

# शहापूर मध्ये वीजबिल कमी करून देतो असे सांगणारा भुरटा सापडला महावितरणच्या जाळ्यात.

लॉक डाऊन पासून माहे जुलै पर्यंत रीडिंग बंद असल्याने ग्राहकांना माहे जुलै मध्ये एकत्रित ४ महिन्याचे बील गेले होते सदर देयक हे रीडिंग प्रमाणे बरोबर असून ते हफ्याने भरण्याची मुभा ग्राहकांना महावितरण कडून देण्यात आली होती. त्या प्रमाणे भरपूर लोकांनी टप्पा टप्प्यात देयके अदा केली परंतु काही लोकांनी आज ना उद्या देयके माफ होतील अश्या आशेवर वीज बिले भरली नाहीत. अश्या लोकांचा काही लोकांनी फायदा घेतला. काही दिवसा पासून शहापूर मध्ये अशेच काही लोक वीज देयके कमी करून देतो आहे सांगुन ग्राहकांना फसवणूक करून त्यांच्याकडे पैसे मागण्याच्या तक्रारी शहापूर कार्यालयात येत होत्या. परंतु तसे करणारा कोण आहे ह्या बाबत काही समजत नव्हते. त्यामुळे



शहापूर उपविभागाचे उपकार्यकारी अभियंता यांनी सर्व कर्मचारी व जनमित्र यांना सतर्क केले व ग्राहकांना या बाबत कल्पना देण्याचे सांगितले. त्यामुळे आज दिनांक १२/०१/२०२१ रोजी अनिरुद्ध अपार्टमेंट, आसनगाव येथील ग्राहकाला समोरून फोन आला की तुमचे वीज बिल कमी केले आहे ते मी घेऊन येत आहे. असे समजल्यावर सदर ग्राहकाने महावितरणच्या कर्मचाऱ्यांना फोन करून सदर हकीकत सांगुन बोलावून घेतले व बील कमी केले असे खोटे सांगून पैसे लुबाडणाऱ्या श्री अरुण कृष्णा शिर्के या व्यक्तीस पकडून त्याला शहापूर पोलीस ठाणे येथे त्यावर रीतसर गुन्हा नोंदवण्यात आला आहे. सदर ठिकाणी शहापूर उपविभागाचे उप कार्यकारी अभियंता श्री अविनाश कट्टकवार, सहाय्यक अभियंता श्री चेतन वाघ, सहाय्यक लेखापाल श्री विशाल सानप, लाईनमन श्री पंकज नाईक, सुरक्षा रक्षक श्री गणेश धसाडे उपस्थित होते. ग्राहकांनी अश्या भुल थापणा बळी पडू नये अश्या प्रकारच्या कोणत्याही व्यक्तीने आपणास बील कमी करून देण्याचे आमिष दाखवल्यास अश्या व्यक्तीची तक्रार जवळच्या महावितरण कार्यालयात करावी तसेच आपले चालू वीज देयक योग्य आहे की नाही हे आपल्या जवळच्या महावितरण कार्यालयात जाऊन समजून घ्या व देयक लवकरात लवकर वीज बिल भरून महावितरण सहकार्य करा. - श्री. अविनाश कटकवार, उपकार्यकारी अभियंता, शहापूर उपविभाग, शहापूर.

बातमीदार : काळूराम भोईर

# सार्वत्रिक ग्रामपंचायत निवडणूका

**खडवली :** एप्रिल २०२० ते डिसेंबर २०२० मध्ये मुदत संपलेल्या जिल्हातील सार्वत्रिक ग्रामपंचायत निवडणूक की साठी १५८ पैकीं १४३ ग्रामपंचायत साठी झालेल्या निवडकीसाठो मतदान पार पडले यापैकी कल्याण तालुक्यातील बेहरे खडवली येथे मतदानाचा हक्क बजावता ना मतदार शिस्तबद्ध पध्दतीने मतदान केंद्रावर मतदान



करताना लावलेल्या रांगेतील मतदार.

बातमीदार : रमेश घरत

# जय हनुमान क्रिकेट क्लब लेनाड (बु) आयोजित आम्ही लेनाडकर चषक २०२१

जय हनुमान क्रिकेट क्लब लेनाड (बु) आयोजित आम्ही लेनाडकर चषक २०२१ क्रिकेट सामान्यांचा आजचा पहिला दिवस धर्मवीर युवा प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य सोमनाथ धिर्डे साहेब, उद्योजक राम पाटोळे साहेब, संपर्क प्रमुख रविंद्र खाडे साहेब, सचिव गणेश धोंडू चौधरी यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून व श्रीफळ वाढवून व राष्ट्रगीताने क्रिकेट सामान्यांचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी आयोजक जनकजी विशे, समाजसेवक अजय पष्टे, रोशन विशे, समीर विशे, मंगेश पवार, महेश विशे, सतीश वाळिंबे, विकी शेवाळे, जय हनुमान क्रिकेट



क्लब लेनाड (बु) चे क्रिकेटपटू परिसरातील तरुण वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बातमीदार : प्रथमेश वाळंज (आसनगाव)

# मांडा- टिटवाळा रस्त्याची अपूर्ण कामे पूर्ण करा

**टिटवाळा:** टिटवाळा पूर्वेकडील निमकर नाका ते सावरकर नगर - इंदिरा नगर रस्त्याचे काम आजही अर्धवट स्थितीत आहे २०१३ मधे हे काम चालू करण्यात आले होते कोणार्क या कंपनीने या कामाचं ठेका घेतलेला आहे ठेकेदाराने रस्त्याच्या दुतर्फा गटारे आणि पदपथ आणि रस्त्याचे डांबरीकरण न करताच अर्ध्यावर सोडून दिले आहे त्यामुळे नागरिकांची गैरसोय होत आहे आणि सतत ये जा करताना खूप मोठ्या प्रमाणात धुळीच्या त्रासाला सामोरं जावं लागत आहे हे काम पुढील २ दिवसात पूर्ण न केल्यास १९ जानेवारी२०२१ रोजी पालिका कार्यालय समोर ठिय्या मांडण्याचा इशारा कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या माजी उपमहापौर तथा नगरसेविका उपेक्षा भोईर यांनी पालिका



आयुक्त आणि शहर अभियान सपना कोळी यांना दिला.

बातमीदार : विशाल डफळ (टिटवाळा)

अंबरनाथ शहरात कोविड - १९ लसीकरणाची सुरुवात आज डॉ.शुभांगी वाडेकर मॅडम यांच्या पासून झाली...एक महिला म्हणून आधीच अनेक पारिवारिक जबाबदरी खांद्यावर असताना,कोरोना काळात अंबरनाथ शहरासाठी जिवाचं रान करणारी आमची ताई... सलाम दीदी दीलसे...❤

ताईच्या सोबत नेहमीच काम करायची इच्छा होती,परंतु त्यासाठी डॉक्टर,आरोग्य कर्मचारी असणे आवश्यक होते. मात्र कॉमर्स चा विद्यार्थी असून कोविड - १९ च्या काळात आरोग्य-सहायक म्हणून अंबरनाथ पालिकेच्या माध्यमातून शहराची सेवा करण्याची संधी मिळाली,उत्कृष्ट आरोग्य सहायक म्हणून सन्मानित पण झालो,त्याच बरोबर आज Front Line Health Worker म्हणून पहिली कोविशिल्ड लस पण मिळाली. धन्यवाद.



बातमीदार : योगेश देशावरे

हे साप्ताहिक मालक, मुद्रक व प्रकाशक, संपादक **श्री. तुकाराम रामदास पाटील यांनी** जय बाबा प्रिंटिंग प्रेस, शॉप नं. ५५५, प्रेस बाजार, मेन रोड, उल्हासनगर-४२१००३ जि. ठाणे. (महाराष्ट्र) येथे छापून हुतात्मा हिराजी पाटील चौक, कोनगाव, ता. भिवंडी, जि. ठाणे. (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

(या अंकात व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वादविवाद भिवंडी न्यायकक्षेत.)